ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# भारतीय शेअर बाजाराचचे बदलते स्वरूप आणि आव्हाने

* डॉ.मैंद बी.व्ही.

* अर्थशास्त्र विभाग प्रमुख, वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी,ता.जि.धाराशिव.

**प्रस्तावना :**

भारतीय शेअर बाजार हा जगातील सर्वात जलद गतीने वाढणारा शेअर बाजार आहे. भारताने प्रथमच हॉंगकॉंग शेअर बाजारला मागे टाकून 5.5 ट्रिलियन डॉलर बाजार भांडवलासह भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे. भारताच्या मार्केट कॅप मध्ये झालेली वाढ ही लक्षणीय आहे. म्हणून 2027 पर्यंत भारत तिसरी जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येण्याची अपेक्षा आहे. विविध अंदाजानुसार 2030 पर्यंत भारताचे मार्केट कॅप 10 ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. जगात अमेरिकेचे मार्केट कॅप 54 ट्रीलिएन सह सर्वात जास्त आहे. तर चीनचे मार्केट कॅप 10 ट्रीलियन डॉलर आणि जपानचे मार्केट कॅप 6.2 ट्रिलियन डॉलर एवढे आहे. जगातील एकूण शेअर बाजाराचे मार्केट कॅप 111 ट्रिलियन डॉलर एवढे आहे. त्यामध्ये भारताचा वाटा 5% ऐवढा आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

जगातील प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत शेअर बाजाराचे स्थान महत्त्वाचे आहे. भांडवलशाहीच्या आणि खाजगी मालमत्तेच्या अस्तित्वासाठी शेअर बाजार महत्त्वाचा आहे. तसेच देशाचा जलद आर्थिक व औद्योगिक विकास घडवून आणण्यामध्ये शेअर बाजारची भूमिका महत्त्वाची आहे. वाढते औद्योगिकीकरणांमध्ये शेअर बाजार निधीच्या त्रुटीने त्रस्त असलेल्या गुंतवणूकदारांना शेअरच्या खरेदी विक्रीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देतो. उद्योगांना दीर्घकालीन भांडवल पुरवठा करण्यासाठी शेअर बाजार मोठ्या प्रमाणावर साह्य करतो.शेअर बाजार हा कंपन्यासाठी पैसा उभा करण्याचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे. शेअर बाजारात कंपनीच्या मालकीचे शेअर्स विकून कंपनीच्या विस्तारासाठी अतिरिक्त आर्थिक भांडवल उभारता येते.ज्या अर्थव्यवस्थेत शेअर बाजार वाढत असतो ती अर्थव्यवस्था ‘अप अँड कमिंग’अर्थव्यवस्था मानली जाते. शेअर बाजार हा देशाच्या आर्थिक शक्तीचा आणि विकासाचा प्राथमिक सूचक मानला जातो. म्हणून कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये शेअर बाजाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

प्रत्येक देशाला स्वतःचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी वित्तीय साधनांची आवश्यकता असते.विकसनशील व अल्प विकसित देशाला तर आर्थिक विकासासाठी वित्तीय साधने महत्त्वपूर्ण असतात. आर्थिक

विकास हा प्रामुख्याने औद्योगिक विकासावर अवलंबून असतो. आणि औद्योगिक विकास हा देशातील गुंतवणुकीच्या प्रमाणावर अवलंबून असतो. देशातील शासन, वित्तीय संस्था व लोक विविध उद्योगात करीत असलेल्या गुंतवणुकीवर औद्योगिकीकरण अवलंबून असते अशी गुंतवणूक ज्या बाजाराद्वारे केली जाते त्या बाजाराला शेअर बाजार असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात शेअर बाजार म्हणजे ज्या ठिकाणी स्टॉक एक्सचेंज मध्ये लिस्टेड असलेल्या कंपन्यांच्या शेअरची खरेदी आणि विक्री स्टॉक ब्रोकर च्या माध्यमातून केली जाते ते ठिकाण होय. शेअर बाजार हे एक असे ठिकाण आहे ज्यामध्ये मोठमोठ्या सूचीबद्ध कंपन्यांच्या शेअरची खरेदी-विक्री स्टॉक ब्रोकरच्या माध्यमातून केली जाते त्या बदल्यात ब्रोकरला काही कमिशन दिले जाते. शेअर बाजार हा एक केंद्रीकृत प्लॅटफॉर्म आहे.जेथे संस्था, खातेदार आणि विक्रेते वेगवेगळ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये ट्रेड करण्यासाठी एकत्र येतात व शेअर बाजारामध्ये ऑनलाईन ट्रेड करतात.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. भारतीय शेअर बाजाराचा अभ्यास करणे.
2. भारतीय शेअर बाजारातील बदलाचा अभ्यास करणे.
3. भारतीय शेअर बाजार समोरील होण्याच्या अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहितकृत्ये :**

1. भारतीय शेअर बाजार आशिया खंडातील सर्वात जुना आहे.
2. भारतीय शेअर बाजारात अनेक बदल होत आहेत.
3. भारतीय शेअर बाजार समोर अनेक आव्हाने आहेत.

**संशोधन पद्धती:**

सदरील शोध निबंध हा दुतीय सामग्रीवर आधारित आहे. यामध्ये शासकीय अहवाल,आरबीआयचा अहवाल,सेबीचा अहवाल,संदर्भ ग्रंथ,पुस्तके, मासिके,वर्तमानपत्र, वेबसाईट इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

**भारतातील शेअर बाजाराचे बदलते स्वरूप :**

भारतीय शेअर बाजाराला खूप मोठा समृद्ध इतिहास आहे. भारताच्या परिदृश्याला आकार व दिशा देण्याचे काम भारतीय शेअर बाजाराने केले आहे. भारतात दोन प्राथमिक शेअर बाजार आहेत. बॉम्बे स्टॉक एक्सचेंज(BSE) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज(NSE). बॉम्बे स्टॉक एक्सचेंज हा आशियातील सर्वात जुना व भारतातील पहिला एक्सचेंज असून जागतिक अग्रगण्य स्टॉक एक्सचेंज पैकी एक आहे. बीएससीची स्थापना 1875 मध्ये झाली तर राष्ट्रीय स्टॉक एक्सचेंजची स्थापना 1992 मध्ये झाली. एनएसई हे बीएससीच्या तुलनेत नवीन एक्सचेंज आहे. परंतु त्याच्या तांत्रिक प्रगतीमुळे आणि नाविन्यपूर्ण पद्धतीमुळे ते त्वरित प्रसिद्ध झाले एनएसीईने भारतात ट्रेडिंगच्या पद्धतीमध्ये अभूतपूर्व क्रांती घडवून आणली व भारतीय शेअर बाजाराच्या आधुनिकीकरणांमध्ये मोठे योगदान दिले आहे. दोन्ही एक्सचेंज समान ट्रेडिंग यंत्रणा,व्यापाराचे तास आणि सेटलमेंट प्रक्रियाचे अनुसरण करतात. जानेवारी 2024 पर्यंत बीएसईकडे 5315 सूचीबद्ध कंपन्या होत्या तर एनएसईकडे डिसेंबर 2023 पर्यंत 2266 कंपन्या सूचीबद्ध होत्या. भारतातील जवळपास सर्वच महत्त्वाच्या कंपन्या दोन्ही एक्सचेंजवर सूचीबद्ध आहेत. दोन्ही एक्सचेंज वरील ट्रेडिंग हे

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

ओपन इलेक्ट्रॉनिक लिमिट ऑर्डर बुक द्वारे होते. ऑर्डर मॅचिंग ट्रेडिंग कॉम्प्युटरद्वारे केले जाते. जागतिक रँकिंग मध्ये बीएससी 10 व्या क्रमांकावर तर एनएसइ 11 व्या क्रमांकावर आहे. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे बाजार भांडवल 3.2 ट्रिलियन डॉलर तर एनएसइचे बाजार भांडवल 2.6 ट्रिलियन डॉलर एवढे मोठे आहे. भारतात मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, कानपूर, हैदराबाद, चंदीगड येथे शेअर बाजार आहेत.

भारतीय शेअर बाजाराचे विनियमन 'भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड' (सेबी) करते. सेबीची स्थापना 1992 मध्ये गुंतवणूकदारांच्या तसेच भागधारकांच्या हक्काचे आणि हिताचे रक्षण करून शेअर बाजारला चालना देण्यासाठी करण्यात आली. सेबी आणि आरबीआय एकत्र येऊन शेअर बाजाराविषयीचे नियम आणि कायदे तयार करतात त्यामुळे देशाच्या आर्थिक उन्नतीस मदत होते.

**जगातील निवडक शेअर बाजार:**

शेअर बाजार संपूर्ण जगामध्ये पसरलेला आहे. जगातील शेअर बाजार गुंतवणुकीच्या गतीशीलतेला आकार व दिशा देण्या बरोबरच जागतिक आर्थिक आरोग्यासाठी भक्कम योगदान देताना दिसून येतात. जगामध्ये प्रथम व दुसऱ्या क्रमांकावर अमेरिकेचा न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज व नॅस्डॅक हे शेअर बाजार आहेत. तर तिसऱ्या क्रमांकावर लंडन स्टॉक एक्सचेंज आहे.हे तीन एक्सचेंज प्रत्येक जागतिक वित्तीय परिसंस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. चौथ्या क्रमांकावर शांघाय स्टॉक एक्सचेंज आहे तर भारताचा बॉम्बे स्टॉक एक्सचेंज दहाव्या क्रमांकावर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज 11 व्या क्रमांकावर आहे.टोरोंटो( कॅनडा), युरोनेक्स्ट( युरोपियन देश), शेंन्झेन (चीन),तैवान, स्विस एक्सचेंज (स्विझर्लंड), कोरिया (द.कोरिया), जपानी एक्सचेंज ग्रुप, ऑस्ट्रेलियन सेक्युरिटीज एक्सचेंज,तेहरान,सौदी स्टॉक एक्सचेंज यासारखे अनेक स्टॉक एक्सचेंज जागतिक शेअर मार्केटमध्ये काम करत आहेत

**भारतीय शेअर बाजाराचे निर्देशांक :**

शेअर बाजार निर्देशांक हे गुंतवणूकदारांना आणि त्याचप्रमाणे सर्वसामान्य जनतेला शेअर बाजारातील घडामोडी आणि अर्थव्यवस्था सुलभतेने समजून देण्याचे एक माध्यम आहे. शेअर बाजारात शेअर खरेदी विक्री व्यवहाराचे बाजार भाव कायम अस्थिर असतात शेअरच्या किमतीत होणारे बदल मोजण्यासाठी शेअरचे बाजार मूल्य काढण्याची जी पद्धत स्वीकारली आहे त्या पद्धतीला निर्देशांक असे म्हणतात. भारतात जागतिक पातळीवर मान्यताप्राप्त दोन शेअर निर्देशांक आहेत.एक म्हणजे बीएसईचा सेन्सेक्स व दुसरा म्हणजे एनएसईचा निफ्टी होय. सेन्सेक्स हा 1986 मध्ये पहिला इक्विटी इंडेक्स म्हणून सादर करण्यात आला. हा एक्सचेंज 10 पेक्षा जास्त क्षेत्रामधील शीर्ष 30 ट्रेडिंग कंपनी यांना ओळखण्यासाठी आधार प्रदान करण्यासाठी आहे. (बेंचमार्क निर्देशांक 30) तर 1995 मध्ये एनएसइने निफ्टी 50 इंडेक्स लॉन्च केला. एनएसई मार्केटमध्ये व्यापार करणाऱ्या स्टॉप 50 कंपन्यांची निफ्टी यादी करते. निफ्टी व्यतिरिक्त एनएसईच्या इतर प्रमुख निर्देशांकामध्ये निफ्टी 500, निफ्टी मिडकॅप 150,निफ्टी स्मॉल कॅप 250 आणि निफ्टी मिडस्मॉल कॅप 400 यांचा समावेश आहे.

**भारतातील डिमॅट खाते:**

डिमॅट अकाउंट हे एक इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील खाते आहे जे

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

की,डिजिटल स्वरूपात शेअर्स आणि सिक्युरिटी धारण करण्याची सुविधा प्रदान करते. ऑनलाइन ट्रेडिंग दरम्यान शेअर्स खरेदी केले जातात आणि डिमॅट अकाउंट वर ठेवले जातात तसेच डिमॅट खात्यावर शेअर्स,सेक्युरिटीज, फंड,बॉण्ड्स आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक एकाच ठिकाणी करता येते. म्हणून शेअर बाजारात यूजर्सना सहज ट्रेडिंग करणे सुलभ होते. भारतात NSDL आणि CDSL सारख्या डिपॉझिटरीज आणि स्टॉक ब्रोकर्स जसे की झिरोदा,एंजल वन सारख्या मध्यस्तामार्फत डिमॅट खाते सेवा प्रदान केली जाते. एनएसई वरील व्यवहारासाठी 1996 पासून डिमॅट ट्रेडिंग सुरू करण्यात आली आहे.

देशात 2019 पर्यंत 3.5 कोटी डिमॅट खाते होती. त्यानंतर दीड वर्षात म्हणजे 2021 पर्यंत डिमॅट खात्यांची संख्या दुपटीपेक्षा अधिक वाढून 7.5 कोटी झाली. सध्या भारतातील डिमॅट खात्यांची संख्या 17.10 कोटी एवढी मोठी आहे.ऑगस्ट 2024 या एका महिन्यात चार लाख डिमॅट खाते उघडण्यात आली. कोविड-19 नंतर भारतातील डीमॅट खात्यांची संख्या लक्षणीय गतीने वाढली आहे. भारतातील डीमॅट खात्यांची संख्या रशिया,मेक्सिको, जपानच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. तसेच दुसऱ्या बाजूला म्युच्युअल फंडातील गुंतवणूकदाराची व गुंतवणुकीची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ऑक्टोंबर 2024 पर्यंत 67,25,615 लाख (67.26 ट्रेलीयन) कोटीने वाढली आहे. गेल्या दहा वर्षात म्युचल फंडातील वाढ सहा पटीने वाढली आहे.गेल्या अनेक वर्षभरात मिळालेल्या चांगल्या परताव्यामुळे गुंतवणूकदारांना शेअर बाजाराने अधिक आकर्षित केले आहे. त्यामुळे भारतीय शेअर बाजारांचा विस्तार झपाट्यांने होत आहे.

**भारतीय शेअर बाजारातील ऑर्डर व वेळ:**

प्रचलित शेअर बाजार व्यापार प्रणालीमध्ये सर्व खरेदी आणि विक्री ऑर्डर प्रदर्शित करून आर्थिक पारदर्शकता आणतो. संस्थात्मक गुंतवणूकदार थेट मार्केट ॲक्सेस पर्याय वापरू शकतात ब्रोकर्सद्वारे प्रदान केलेल्या ट्रेडिंग टर्मिनलचा वापर करून स्टॉक मार्केट ट्रेडिंग सिस्टीम मध्ये थेट ऑर्डर देण्यासाठी इक्विटी पॉट मार्केट रोलिंग सेटलमेंटचे अनुसरण करतात. शेअर बाजारात सोमवारचा कोणताही व्यापार मंगळवार पर्यंत सेटल होतो. शेअर बाजारातील सर्व ट्रेडिंग सकाळी 9.15 ते दुपारी 3.30 भारतीय प्रमाण वेळेनुसार (5.5GMT) सोमवार ते शुक्रवार दरम्यान केली जाते. सर्व शेअरची डिलिव्हरी डीमटेरियलाइज्ड स्वरूपात केली जाते. प्रत्येक एक्सचेंजचे स्वतःचे क्लिअरिंग हाऊस असते. हे क्लिअरिंग हाऊस शेअर्स गोळा करणे, वितरित करणे आणि ट्रेडर्सना पेमेंटची हमी देण्याचे काम करत असतात.

**भारतीय शेअर मार्केट समोरील आव्हाने:**

भारतीय शेअर बाजाराला अनेक आव्हानांना सामोर्य जावे लागत आहे. जसे की जागतिक आर्थिक अस्थिरता, भू-राजकीय तणाव, परदेशी गुंतवणुकीतील बदल, उच्च चलनवाढ, कंपन्यांचे कमकुवत निकाल, ब्रोकरची कमतरता,वित्तीय साक्षरतेचा अभाव,शेअर बाजाराविषयी अनावश्यक भीती, जगातील युद्धजन्य परिस्थिती, विकसित देशांच्या आर्थिक धोरणातील बदल. या सर्वांचाच कमी - अधिक प्रमाणात भारतीय शेअर बाजारावर खूप मोठा परिणाम होत आहे.

शेअर बाजारात सर्वसामान्य गुंतवणूकदार कमी कालावधीत भरपूर फायदा मिळवू इच्छितात.कोणतीही माहिती नसताना

कोणाच्या तरी सांगण्यावरून गुंतवणूक करतात आणि स्वतःचे नुकसान करून घेतात.त्यामुळे स्वतःला माहिती नसेल तर धोका पत्कारू नये.शेअर बाजारात गुंतवणूक करायची असेल तर त्यासाठी सखोल अभ्यास करणे, माहिती घेणे आवश्यक आहे.गुंतवणुकी बाबतचे आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे, टेक्निकल ॲनालिसिस सारखे तंत्र अधिक अचूकपणे समजून घेणे शेअर बाजारात महत्त्वाचे आहे.

**सारंश :**

भारतीय शेअर बाजारातील बहुतांश व्यवहार BSE आणि NSE मध्ये होतात.2024 पर्यंत भारत जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी बाजारपेठ आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी हे दोन प्रबळ भारतीय शेअर बाजाराचे निर्देशांक आहेत. आजही भारतात शेअर बाजारातील गुंतवणूकदारांचे प्रमाण अवघे दोन-तीन टक्के आहे. हे प्रमाण भविष्यात वाढणे गरजेचे आहे . भारतीय शेअर बाजारावर आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत घडामोडीचे प्रचंड पडसाद उमटत असतात त्यामुळे या सर्व बाबींचा अभ्यास करून गुंतवणूक केल्यास चांगला फायदा मिळवून आपल्या संपत्तीत वाढ करता येते. भारतीय शेअर मार्केट मधील मजबूत वाढ, वाढती परकीय गुंतवणूक, मजबूत कॉर्पोरेट कामगिरी, शेअर बाजारातील सुधारणा आणि किरकोळ गुंतवणूकदारांना प्रभावित करणारे इतर महत्त्वाचे घटक शिवाय किरकोळ गुंतवणूकदारांचा उत्साही सहभाग तसेच वाढते संस्थात्मक गुंतवणूकदार आणि नवनवीन कंपन्याचे IPO भारतीय शेअर बाजाराला मोठ्या प्रमाणात गती देत आहेत.

**संदर्भुरांतसूची :**

1. *दिनकर कुमार: वॉरेन बफे,प्रभात पेपर बॉक्स पब्लिकेशन, मुंबई.*
2. *महेशचंद्र कोषीक: शेअर बाजार मे सफल कैसे हो, हॅबेक्स पब्लिकेशन मुंबई.*
3. *सुद्धा श्रीमाली: शेअर मार्केट गाईड, प्रभात पेपर बॉक्स पब्लिकेशन, मुंबई.*
4. *Jitendra Gala :Indian stock market, Buzzingstock publishing house Mumbai.*
5. *Ankita Gala: fundamental analysis of shares, Buzzingstock publishing house Mumbai.*
6. *www. India's stock market*
7. *wwww.sebi.com*

*Cite This Article:*

**डॉ. मैंद बी.व्ही .** *(2025). भारतीय शेअर बाजाराचचे बदलते स्वरूप आणि आव्हाने .* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number I, pp. 17–20)Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16450363